लोकमत

# पुणे महानगरपालिका
## जाहीर आवाहन

विषय : पुणे मनपाचे रुग्णालयांमध्ये तज्ञ बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी (पी.जी.बॉन्ड) व बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी (यु.जी.बॉन्ड) यांचे सेवेबाबत

**संदर्भ** : १. मा. स्थायी समिती ठराव क्र. २१९१, दि. २६/०२/२०१५.
२. मा. स्थायी समिती ठराव क्र. २०६३, दि. १४/०१/२०२०.
३. मा. स्थायी समिती ठराव क्र. २०६२, दि. १४/०१/२०२०

पुणे महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत शहरातील ४९ बाह्यरुग्ण विभाग, १८ प्रसुतिगृह, ०१ सर्वसाधारण रुग्णालय, ०१ सांसर्गिक रोग रुग्णालय, ०२ ई हेल्थ सेंटर, ०१ स्मार्ट क्लिनिक, ०२ फिरते दवाखाने, ०१ लसीकरण केंद्रामार्फत नागरिकांना वैद्यकीय सेवा व सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. शहराच्या विस्तारीकरणामुळे या सर्व दवाखाने/रुग्णालयांमधून वैद्यकीय सेवा घेणाऱ्या नागरिकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने संदर्भ क्रमांक (१) अन्वये पुणे महानगरपालिका आरोग्य विभागाकडे तज्ञ बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी (पी.जी.बॉन्ड) डॉक्टर्सच्या एकूण १२४ पदांना मान्यता मिळालेली असून, पुणे महानगरपालिकेमध्ये तज्ञ बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी (पी.जी.बॉन्ड) यांची ३६४ दिवसांचे कालावधीकरिता सेवा घेण्यात येत असून, त्यांना संदर्भ क्र. २ चे मा. स्थायी समितीचे ठरावान्वये तज्ञ बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी (पी.जी.बॉन्ड) यांना दरमहा एकत्रित रक्कम रु. ७१६९७/- (अक्षरी रक्कम रु. एक्काहत्तर हजार सहाशे सत्त्याण्णव फक्त) देणेस मान्यता देण्यात आलेली असून त्याप्रमाणे दरमहा रक्कम अदा करणेत येईल.

तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामधून एम.बी.बी.एस. पदवी उत्तीर्ण झालेल्या वैद्यकीय अधिकारी (एकूण मान्य पदे ५७) यांना पुणे महानगरपालिकेच्या दवाखान्यांमध्ये बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी (यु.जी.बॉन्ड) म्हणून ३६४ दिवसांचे कालावधीकरिता रूजू करून घेणेस पुणे महानगरपालिकेच्या मा. स्थायी समितीने संदर्भ क्र. ३ चे ठरावान्वये मान्यता दिलेली असून सदर वैद्यकीय अधिकारी यांना दरमहा एकत्रित रक्कम रु. ५२०००/- फक्त (अक्षरी रक्कम रु. बावन्न हजार फक्त) देण्यात येणार आहे.

तरी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधून एम.बी.बी.एस. व पदवी/पदव्युत्तर शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेले व नियमाप्रमाणे आंतरवासिता पूर्ण झालेले वैद्यकीय विद्यार्थी यांना आवाहन करण्यात येते की, आपण पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामध्ये बंधपत्रित सेवेत रूजू होऊन आपली बंधपत्रित सेवेचा कालावधी पूर्ण करणेस विनंती आहे. नियमाप्रमाणे तज्ञ बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी/बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी यांना अनुभवाचा दाखला व दरमहा वेतन पुणे मनपामार्फत अदा करण्यात येईल याची नोंद घेऊन दि. ०१/०२/२०२० पासून तज्ञ बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी/बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी यांनी पुणे महानगरपालिकेच्या **pmc.gov.in** या वेबसाईटवर दिल्याप्रमाणे अर्ज व आवश्यक कागदपत्रे घेऊन सदर अर्ज पुणे महानगरपालिका भवन, आरोग्य विभाग, तिसरा मजला, मेडिकल युनिट विभाग, शिवाजीनगर, पुणे ४११००५ येथे सादर करावा. त्यानंतर सदर अर्जाची छाननी करून नियमाप्रमाणे नियुक्ती देण्यात येईल. (अधिक माहितीसाठी ०२०-२५५०१२३६ मेडिकल युनिट विभाग येथे संपर्क साधावा.)

तज्ञ बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी/बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी रिक्त पदांचा तक्ता :

### पुणे महानगरपालिका आरोग्य विभाग
**बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी (पी.जी.बॉन्ड) मान्य पदांची माहिती**
**दरमहा एकवट वेतन रक्कम रु. ७१६९७/- फक्त**

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे |
|---|---|---|
| १. | आय.सी.यु. फिजिशियन/इंटेंसिव्हीस्ट | ७ |
| २. | फिजिशियन | १० |
| ३. | निवासी फिजिशियन | ०४ |
| ४. | कार्डीऑलॉजिस्ट | ०१ |
| ५. | शल्य विशारद | १० |
| ६. | युरो सर्जन | ०१ |
| ७. | न्युरो सर्जन | १ |
| ८. | बालरोग तज्ञ | ०९ |
| ९. | नवजात अर्भक तज्ञ | ०२ |
| १०. | पॅथोलॉजिस्ट | ०८ |
| ११. | रेडिओलॉजिस्ट | १५ |
| १२. | चेस्ट स्पेशालिस्ट | ०२ |
| १३. | स्त्री रोग तज्ञ | ०५ |
| १४. | बालरोग शल्यविशारद | ०५ |
| १५. | भूल तज्ञ + बधिरीकरण तज्ञ | ०६ |
| १६. | कान नाक घसा तज्ञ | ०३ |
| १७. | नेत्र शल्य चिकित्सक | ०० |
| १८. | अस्थिव्यंग तज्ञ | ०२ |
| १९. | मानसोपचार तज्ञ | ०१ |
| २०. | मायक्रोबायोलॉजिस्ट | ०२ |
| २१. | दंतशल्य चिकित्सक | ०६ |

### पुणे महानगरपालिका आरोग्य विभाग
**बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी (यु.जी.बॉन्ड)**
**दरमहा एकवट वेतन रक्कम रु. ५२०००/- फक्त**

| अ.क्र. | पदाचे नाव | मंजूर रिक्त पदे |
|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | ५७ |

**आवश्यक कागदपत्रे :**

१. एम.बी.बी.एस. प्रमाणपत्र/गुणपत्रिका तीनही वर्षांच्या (Marklist)
२. पदवी/पदविका प्रमाणपत्र/गुणपत्रिता (Degree Certificate)
३. Bonded candidate Certificate or Affidavite
४. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र (Permanent Registration)
५. भारतीय वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र (Indian Medical Counsil Registration)
६. आंतरवासिता प्रमाणपत्र (Internship Complition Certificate)
७. जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (Cast Certificate and cast Validity)
८. अनुभवाचा दाखला (Experience Certificate)
९. वयाचा दाखला (Age Certificate)/ आधारकार्ड/पॅनकार्ड/पासपोर्ट साईज फोटो १

स्वाक्षरी/-
(डॉ. रामचंद्र हंकारे)
आरोग्य प्रमुख
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/१२०२, दि. ३१/१/२०